महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ९७/३४८१६२९ दिनांक :- १२ ऑक्टोबर २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडाच्या २२ व्या लोकशाही दिनात ३ अर्जांवर सुनावणी

मुंबई, दि. १२ ऑक्टोबर, २०२६ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) आज २२ वा लोकशाही दिन आयोजित करण्यात आला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा. प्र. से.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २२ व्या लोकशाही दिनात तीन अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात झालेल्या लोकशाही दिनात अर्जदार श्री. रवींद्र सावंत यांनी अर्ज केला होता. श्री. रवींद्र सावंत यांच्या नावे माहीम टी एच कटारिया मार्गावरील भानु कुंज या म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतीत सदनिका होती. सदर इमारतीचा पुनर्विकास होऊन पुनर्विकसित इमारतीमध्ये पुनर्वसन सदनिकेचा ताबा देतेवेळी संबंधित विकासकाने श्री. रवींद्र सावंत यांच्याकडे सुमारे आठ लाख रुपये जीएसटी भरण्याची व गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचे शुल्क व इतर शुल्क भरण्याची मागणी केली. याबाबत अर्जदार श्री. सावंत यांनी म्हाडा लोकशाही दिनात अर्ज केला होता. सदर अर्जावर सुनावणी घेताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी सदर सदनिका ही उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासानंतर उपलब्ध झालेली पुनर्वसन सदनिका असल्याने संबंधित विकासकाने यावर जीएसटी आकारू नये, असे निर्देश देत संबंधित विकासकाला याबाबत तात्काळ पत्राद्वारे कळविण्याचे निर्देश श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच अर्जदाराला तात्काळ सदनिकेचा ताबा संबंधित विकासकाने देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्री. ज्ञानेश्वर गरकळ यांनी आजच्या लोकशाही दिनात अर्ज केला होता. म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे सन २०२१ मध्ये काढण्यात आलेल्या २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील सदनिकेसाठी सोडतीमध्ये श्री. ज्ञानेश्वर गरकळ विजेते अर्जदार ठरले. सन २०२६ मध्ये इमारतीतील काही मजल्यांसाठी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले. त्यानंतर सदनिकेची संपूर्ण विक्री किंमत देऊन देखील संबंधित विकासकाकडून पायाभूत सुविधा विकास शुल्क म्हणून वाढीव रक्कम भरण्याचे अर्जदार श्री. गरकळ यांना कळविण्यात आले. याबाबत श्री. गरकळ यांनी आजच्या लोकशाही दिनामध्ये अर्ज केला. सदर अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित विकासकाने वाढीव पायाभूत सुविधा विकास शुल्क आकारू नये, असे निर्देश संबंधित विकासकाला देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सदर निर्णयामुळे अर्जदार श्री. गरकळ यांना दिलासा मिळाला असून श्री. गरकळ यांना येत्या बुधवारी सदनिकेचा ताबा देण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले आहेत.

श्री. कल्पेश साळवे यांच्या २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील सदनिकेसाठी वाढीव शुल्क आकारणीबाबतच्या अर्जावर सुनावणी करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी त्यांच्या स्तरावर संबंधित विकासक यांना बोलावून सुनावणी ठेवण्याचे निर्देश दिले.

###

स्वाक्षरीत/ -

**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा** (करिता)

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051.☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 97/3481629 Dt. October 12, 2026

**Press Release**

# MHADA’s 22nd Lokshahi Din: Three Public Grievances Heard

Mumbai, October 12, 2026: The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) organised its 22nd Lokshahi Din today. Three applications were heard during the Lokshahi Din held under the chairmanship of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA.

The Lokshahi Din was held at MHADA Headquarters in Bandra East, Mumbai. Applicant Mr. Ravindra Sawant had submitted an application regarding a rehabilitation flat in Bhanu Kunj, a cessed building of MHADA located on T. H. Kataria Marg, Mahim. Following the redevelopment of the building, the developer demanded approximately ₹8 lakh towards GST, along with charges for the formation of a housing society and other fees, at the time of handing over possession of the rehabilitation flat.

During the hearing, MHADA's Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal directed that GST should not be levied on the rehabilitation flat, as it had been made available following the redevelopment of a cessed building. He instructed the concerned officials to immediately communicate this decision to the developer in writing. He also directed the officials to take immediate necessary action to ensure that the developer hands over possession of the flat to the applicant.

Applicant Mr. Dnyaneshwar Garkal had been declared a successful winner in the 2021 lottery for a flat under the 20% Inclusive Housing Scheme of MHADA’s Konkan Board.

In 2026, an Occupancy Certificate was received for certain floors of the building. Despite having paid the full sale price of the flat, the applicant was subsequently asked by the developer to pay an additional amount towards infrastructure development charges.

During the hearing, Mr. Jaiswal directed the concerned officials to instruct the developer not to levy additional infrastructure development charges on the applicant. This decision has provided relief to applicant Mr. Garkal. Mr. Jaiswal also directed the concerned officials to take the necessary steps to ensure that possession of the flat is handed over to the applicant by Wednesday.

The third application was submitted by Mr. Kalpesh Salve regarding the levy of additional charges for a flat allotted under the 20% Inclusive Housing Scheme. After hearing the matter, Mr. Jaiswal directed the concerned officials to arrange a hearing at his level by calling the developer concerned.

###

Sd/-
Chief Public Relations Officer / MHADA (For)

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051. ☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 97/3481629 Dt. 12 अक्टूबर 2026

**प्रेस विज्ञप्ति**

# म्हाडा के 22वें लोकशाही दिवस में तीन आवेदनों पर सुनवाई

मुंबई, दिनांक 12 अक्टूबर, 2026: महाराष्ट्र गृहनिर्माण एवं क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) की ओर से आज 22वें लोकशाही दिवस का आयोजन किया गया। म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल (भा.प्र.से.) की अध्यक्षता में आयोजित इस लोकशाही दिवस में तीन आवेदनों पर सुनवाई की गई।

बांद्रा पूर्व स्थित म्हाडा मुख्यालय में आयोजित लोकशाही दिवस में आवेदक श्री रवींद्र सावंत ने आवेदन प्रस्तुत किया था। श्री सावंत के नाम पर माहिम के टी. एच. कटारिया मार्ग स्थित म्हाडा की उपकरप्राप्त इमारत 'भानु कुंज' में एक सदनिका थी। उक्त इमारत के पुनर्विकास के बाद पुनर्विकसित इमारत में पुनर्वास सदनिका का कब्जा सौंपते समय संबंधित विकासक ने श्री सावंत से लगभग आठ लाख रुपये जीएसटी, आवासीय सहकारी संस्था के गठन शुल्क तथा अन्य शुल्कों का भुगतान करने की मांग की थी। इस संबंध में श्री सावंत ने म्हाडा के लोकशाही दिवस में आवेदन प्रस्तुत किया था।

इस आवेदन पर सुनवाई के दौरान म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल ने निर्देश दिया कि चूंकि उक्त सदनिका उपकरप्राप्त इमारत के पुनर्विकास के बाद उपलब्ध कराई गई पुनर्वास सदनिका है, इसलिए संबंधित विकासक इस पर जीएसटी नहीं लगाए। उन्होंने संबंधित अधिकारियों को इस संबंध में विकासक को तत्काल पत्र जारी कर सूचित करने तथा आवेदक को सदनिका का कब्जा शीघ्र दिलाने के लिए आवश्यक कार्रवाई करने के निर्देश दिए।

श्री ज्ञानेश्वर गरकल ने भी आज के लोकशाही दिवस में आवेदन प्रस्तुत किया था। म्हाडा के कोंकण मंडल द्वारा वर्ष 2021 में आयोजित 20 प्रतिशत समावेशी आवास योजना की लॉटरी में श्री गरकल एक सदनिका के विजेता घोषित हुए थे। वर्ष 2026 में इमारत की कुछ मंजिलों के लिए अधिभोग प्रमाणपत्र प्राप्त हुआ। इसके बाद सदनिका की पूरी बिक्री कीमत का भुगतान करने के बावजूद संबंधित विकासक ने आवेदक से बुनियादी ढांचा विकास शुल्क के नाम पर अतिरिक्त राशि जमा करने की मांग की। श्री गरकल के आवेदन पर सुनवाई करते हुए म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल ने संबंधित अधिकारियों को विकासक को अतिरिक्त बुनियादी ढांचा विकास शुल्क नहीं वसूलने के निर्देश देने को कहा। इस निर्णय से आवेदक श्री गरकल को राहत मिली। साथ ही, श्री जयसवाल ने संबंधित अधिकारियों को आगामी बुधवार को श्री गरकल को सदनिका का कब्जा दिलाने के निर्देश दिए।

श्री कल्पेश साल्वे ने 20 प्रतिशत समावेशी आवास योजना के अंतर्गत सदनिका के लिए अतिरिक्त शुल्क वसूले जाने के संबंध में आवेदन प्रस्तुत किया था। इस आवेदन पर सुनवाई के दौरान म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल ने संबंधित विकासक को अपने स्तर पर बुलाकर मामले की सुनवाई करने के निर्देश दिए।

###

Sd/-
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा (के लिए)

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA
लोकशाही
दिन

